जा.क्र. स्थागुअशा/प्रेस नोट/3488/2020
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग
दिनांक- 4 .12.2020

---// **प्रेस नोट** //---

## अवैधरीत्या शस्त्रे बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई

---

जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत मा.पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग व मा. अपर पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांनी सुचना दिलेल्या होत्या. त्या अनुषंगाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई करणेसाठी स्थानिक गुन्हे शाखेकडून पोलीस निरीक्षक, श्री.सुनिल धनावडे यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस उपनिरीक्षक श्री.शाहू देसाई यांचे नेतृत्वाखाली विशेष पथक नियुक्त करण्यात आलेले होते.

सदर पथकास दि.03.12.2020 रोजी कुडाळ तालुक्तातील गाव मौजे बांव, तिरांबीवाडी येथे काही इसम शिकारी करीता शस्त्रांसह फिरत असल्याची माहीती मिळाली. त्यावरुन सदर पथकाने पोलीस निरीक्षक, श्री.सुनिल धनावडे यांचे मार्गदर्शनाखाली बांव, तिरांबीवाडी येथे जावून सापळा रचून तेथे शिकारीसाठी फिरत असलेल्या 16 इसमांना बंदुक, काडतुस, रिक्षा, मोटार सायकल व इतर साहीत्यास 18:15 वाजता ताब्यात घेतले.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे 1)सुहास सुरेश सुर्वे, वय-28, रा.सरंबळ, 2)बुधाजी काशिराम धुरी, वय-55, रा.वाडीवरवडे, 3)राजन महादेव नारींग्रेकर, वय-42, रा.नेरुर तर्फ हवेली, 4)उदय रमेश बाणे, वय-44, रा.नाबरवाडी, कुडाळ, 5)स्वप्नील विलास सावंत, वय-30, रा.पेंडुर, 6)सदाशिव सहदेव नाईक, वय-49, रा.कांदोळी, माणगांव, 7)निखील मिलींद वाईरकर, वय-24, रा.कट्टा, वाईरकरवाडी, 8)जिवबा शशिकांत पालव, वय-30, रा.बांबूळी, देऊळवाडी, 9)तेजस गोपाळ बाणे, वय-19, रा.कुडाळ नाबरवाडी, 10)संतोष जिवाजी बाणे, वय-49, रा.कुडाळ नाबरवाडी, 11)लक्ष्मण रमेश बावकर, वय-20, रा.बाव देऊळवाडी, 12)शेखर रामचंद्र माळकर, वय30, रा.बांबूळी, देऊळवाडी, 13)सुबोध दत्ताराम राऊळ, वय-35, रा.कुडाळ नाबरवाडी, 14)श्रीधर संजय बांबुळकर, वय-19, रा.बांबुळी देऊळवाडी, 15)सौरभ बाळकृष्ण वालावलकर, वय-20, रा.पेंडूर, 16)सचिन विलास सावंत, वय-28, रा.पेंडूर अशी आहेत. सदर आरोपींकडून 1,75,000/- रुपये किंमतीच्या एकुण 6 काडतुसच्या बंदुका, 1,050/- रुपये किंमतीची एकुण 7 काडतुसे व 2,60,000/- रुपये किंमतीच्या 5 मोटार सायकल व 1 रिक्षा असा एकुण 4,36,050/- रुपये किंमतीची मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई श्री.राजेंद्र दाभाडे, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग, श्री.तुषार पाटील, अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुनिल धनावडे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक, श्री.शाहू देसाई, श्री.सचिन शेळके, व पोलीस अंमलदार सुधीर सावंत, गुरुनाथ कोयंडे, आशिष गंगावणे, प्रमोद काळसेकर, प्रथमेश गावडे, चंद्रकांत पालकर, रवि इंगळे, चंद्रहास नार्वेकर यांनी केलेली आहे .

04-12-2020

( सुनिल धनावडे )
पोलीस निरीक्षक, स्थागुअशा सिंधुदुर्ग
पोलीस अधीक्षक, कार्यालय सिंधुदुर्ग

प्रति,

जिल्हा माहीती अधिकारी, सिंधुदुर्ग